जिल्हा परिषद अमरावती

# मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय

दूरध्वनी क्रमांक ०७२१ २६६२९२६

ई-मेल – ceozp.amravati@maharashtra.gov.in

जा.क्र – जिप/मुकाअ/स्वी.स./ १५५० | दिनांक- २२ एप्रिल २०२६

**जिल्हा परिषद अमरावती अतंर्गत विविध योजनां, उपक्रमांची माहिती समाजमाध्यमे आणि वृतपत्रांमध्ये प्रसिध्दीस देणेसाठी "माहिती व संवाद" कक्ष सुरु करणेबाबत..**

वाचा – जि.प.अ/साप्रवि/सप्रअ/१५४७/२०२६ दि. २२ एप्रिल २०२६.

## परिपत्रक

शासनाच्या विविध लोकाभिमूख योजना,उपक्रम आणि नागरिकांच्या सेवेसाठी सुरु असलेले विविध पोर्टल इत्यादींची माहिती सर्व सामान्य नागरिकांपर्यत पोहचविण्यासाठी दैनिक वृतपत्रे, विविध समाजमाध्यमे (twiter, facebook, you tube, instragram) यांची महत्वाची भूमिका आहे. अमरावती जिल्हा परिषदेअतंर्गत विविध विभागांमध्ये महत्वाकांक्षी योजना/उपक्रम राबविले जातात. सदरचे उपक्रम, क्षेत्रिय स्तरावर सुरु असलेली कार्यवाही, बैठकां/सभा मध्ये झालेल्या निर्णयाची माहिती वृतपत्रात प्रसिध्दीस देणेसाठी जिल्हा परिषद, सामान्य प्रशासन विभाग विभागाच्या अखत्यारीत "माहिती व संवाद कक्ष" शुक्रवार दिनांक २४ एप्रिल २०२६ पासून सुरु करण्यात येत आहे.

जि.प.मुख्यालय आणि तालुकास्तरावरील कार्यालयांनी त्यांचेकडील योजनाविषयक आणि नाविण्यपूर्ण उपक्रमांविषयाची माहिती प्रसिध्दीस देणेसाठी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. जिल्हा परिषद, पंचायत समिती, विविध विभागांचे तालुका कार्यालयें यांनी आपली योजना विषयक /विविध बैठकीत घेतलेल्या माहिती प्रसिध्दीस देणेसाठी "माहिती व संवाद कक्ष" मार्फत देण्यासाठी श्री. हेमंतकुमार यावले,जनसंपर्क अधिकारी (मो.नं. ८८०५३१२७५२) आणि श्री. दिनेश घाडगे सहा.जनसंपर्क अधिकारी (मो.नं. ९८५०३३६५९२) या क्रमांकाच्या भ्रमणध्वनी क्रमांकवर पाठवावी.
२. प्रसिध्दीची दयावयाची माहिती विषयानुसार संक्षिप्त स्वरुपात असावी. शक्यतो त्यामध्ये सहभागी लाभार्थी इत्यादीची नावे आणि प्रतिक्रिया असावी.
३. प्रत्येक विभागाने आठवडयातून किमान एक उपक्रमाविषयाची माहिती "माहिती /फोटो/व्हिडीओ इ. माहिती व संवाद या कक्षाकडे पाठवावी.
४. वर्तमानपत्रातील नकारात्मक बातमीचे खंडण करणे आवश्यक असते. अशावेळी "माहिती व संवाद कक्षाकडून संपर्क साधल्यानंतर तातडीने माहिती पुरविण्यात यावी.

(सत्यम गांधी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

प्रतिलिपी,

१. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अमरावती.
२. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, अमरावती.
३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन, जि.प.अमरावती.
४. सर्व विभाग प्रमुख, जि.प. अमरावती.
५. गट विकास अधिकारी, पंचायत समिती.....सर्व,